

# श्रावण

सरी ऊन तेजाचे, श्रावणाच्या अंगोपांगी
हिरवाईने नटलेला, साज ल्याली मायमाऊली

गार गारवा आला, सुगंधित होई माती
दाट दाट धुक्यातूनी सरसर ओघळे मोती

ऊन-पावसाचा चाळे, लपंडाव या श्रावणी
इंद्रधनुची कमान, फिरे माझ्या ग अंगणी.

लाल पिवळ्या फुलांची, रास जागोजागी होई
प्राजक्ताच्या फुलांची ग, माळ देव्हाऱ्यात जाई

थेंब थेंब पाण्याने, वेल जाई ग वाकूनी
जशी नव्या नवरीने, चेहरा घेतला झाकूनी

अशा या श्रावणी, फुलांची ग नवलाई
मेंदीच्या ग रंगोळ्या, हाता येई अपुर्वाई.

मनी ओढ श्रावणाची, दिसे माहेर भोवती
मन पाखरू पाखरू, फिरे आठवणी सोबती

प्राची दिनेश कर्वे
पुणे
M-9881374542